यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत चंद्रपुर जिल्हयातील ३५२२ वैयक्तिक घरकुल लाभार्थ्यांच्या प्रस्तावास कार्योत्तर मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग
शासन निर्णय क्रमांक : यचमु-२०२४/प्र.क्र.४४१/योजना-१
नवीन प्रशासकीय इमारत,३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ११ जुलै, २०२४.

संदर्भ:-१) शासन निर्णय, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग क्र. गृनियो-२०१७/प्र.क्र.६०/विजाभज-१, दिनांक २४.०१.२०१८.

२) शासन शुध्दीपत्रक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग क्र.गृनियो-२०१७/प्र.क्र.६०/ विजाभज-१, दिनांक ०८.०१.२०१९.

३) शासन शुध्दीपत्रक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग क्र.गृनियो-२०१७/ प्र.क्र.६०/ विजाभज-१, दिनांक ०८.०३.२०१९.

४) शासन शुध्दीपत्रक, विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण विभाग क्र.गृनियो-२०१७/प्र.क्र.६०/ विजाभज-१, दिनांक ११.०९.२०१९.

५) जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत / घरकुल योजना जिल्हास्तरीय समिती, चंद्रपुर यांचे क्रमांक ४२७, दिनांक २४.०६.२०२४ रोजीचे प्रशासकीय मान्यता आदेश.

६) सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, चंद्रपुर यांचे क्रमांक ४२७, दिनांक २४.०६.२०२४ रोजीचे पत्र.

शासन निर्णय :-

विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील घटकांसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत/घरकुल योजनेंतर्गत शासन निर्णय संदर्भ क्रमांक १ व शासन शुध्दीपत्रक संदर्भ क्र. २ ते ४ मधील तरतुदींनुसार जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत / घरकुल योजना जिल्हास्तरीय समिती, चंद्रपुर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २०.०६.२०२४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये जिल्हास्तरीय समितीने दिनांक २४.०६.२०२४ रोजीच्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता दिलेल्या चंद्रपुर जिल्ह्यातील ३५२२ वैयक्तिक घरकुल लाभार्थ्यांचा प्रस्ताव संदर्भ क्र.६ येथील पत्रान्वये शासनास प्राप्त झाला आहे.

२. सदरहू प्रस्तावाच्या अनुषंगाने, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत सन २०२४-२५ करीता चंद्रपुर जिल्ह्यातील खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे ३५२२ वैयक्तिक घरकुल लाभार्थ्यांना कार्योत्तर मान्यता आणि सदरहू लाभार्थ्यांकरीता प्रति लाभार्थी रु.१.३० लक्ष प्रमाणे रु.४५,७८,६०,००० /-(अक्षरी रुपये पंचेचाळीस कोटी अठ्याहत्तर लक्ष साठ हजार फक्त) व ४ टक्के

प्रशासकीय निधी (प्रति घरकुल रु.५२००/- प्रमाणे) रु.१,८३,१४,४००/- (अक्षरी रुपये एक कोटी त्र्याऐंशी लक्ष चौदा हजार चारशे फक्त) असा एकूण रु.४७,६१,७४,४००/- (अक्षरी रुपये सत्तेचाळीस कोटी एकसष्ट लक्ष चौऱ्याहत्तर हजार चारशे रुपये फक्त) इतक्या निधीस शासनाची मान्यता देण्यात येत आहे. सदरहू निधीपैकी तूर्त रु.९,५२,००,०००/- (अक्षरी रुपये नऊ कोटी बावन्न लक्ष फक्त) इतका निधी वितरीत करण्यात येत असून उर्वरित निधी या योजनेंतर्गत निधीच्या उपलब्धतेनुसार अदा करण्यात येईल.

अ.क्र.	तालुका	दिनांक २४.०६.२०२४ रोजीच्या प्रशासकीय मान्यता आदेशातील लाभार्थ्यांचा अनुक्रमांक	लाभार्थी संख्या
१.	बल्लारपुर (२०२३-२४)	१ ते २९	२९
२.	ब्रम्हपुरी (२०२३-२४)	३० ते २९०	२६२
	ब्रम्हपुरी (२०२४-२५)	२९१ ते ४९०	२००
३.	सावली (२०२४-२५)	४९१ ते २८५५	२३६५
४.	सिंदेवाही (२०२३-२४)	२८५६ ते ३५२२	६६६
		एकूण	३५२२

३. यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत ३५२२ वैयक्तिक घरकुल लाभार्थ्यांना सदरहू मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१. चंद्रपुर जिल्हास्तरीय समितीने पात्र ठरवलेल्या व छाननीअंती अंतिम केलेल्या लाभार्थ्यांपैकी फक्त वरील तक्त्यात नमूद पात्र लाभार्थ्यांनाच सदरहू योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील.
२. सर्व लाभार्थी विजाभज प्रवर्गातील वैयक्तिक जात प्रमाणपत्र धारक असणे बंधनकारक असून अशाच व्यक्तीस सदरहू योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील.
३. ज्या व्यक्तीचे जात प्रमाणपत्र आहे त्याच व्यक्तीस लाभ अनुज्ञेय राहील दुसऱ्या व्यक्तीस लाभ अनुज्ञेय राहणार नाही.
४. या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना सन २०२२-२३ अथवा २०२३-२४ या वर्षाचा उत्पन्नाचा दाखला सादर करणे आवश्यक राहील.

५. सर्व लाभार्थ्यांना आदेशाच्या दिनांकापासून एका महिन्यात अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

६. लाभार्थ्यांपैकी एखाद्या व्यक्तीच्या नावात, पालकाच्या / वडीलांच्या नावात अथवा आडनावात तफावत असल्यास ती तफावत दुर करण्यासाठी संबंधित व्यक्तीच्या नावाचा, पालकाच्या नावाचा व आडनावाचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील. नाव/आडनावातील तफावत दुर न झाल्यास अशा व्यक्तीस सदरहू योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

७. पात्र लाभार्थ्यांची नावे दुबार झाल्यास सदरहू नावे वगळून शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करावी.

८. जिल्हास्तरीय समितीने संदर्भाधिन शासन निर्णय/शुद्धीपत्रकांतील अटी व शर्तींचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

४. सदरहू प्रकरणी लाभार्थ्यांच्या सर्व कागदपत्रांची व अटींची पुर्तता झाल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, चंद्रपुर व सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, चंद्रपुर यांची राहील.

५. सदरहू निधी वितरीत करण्यासाठी उप सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना “नियंत्रक अधिकारी” तसेच सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, चंद्रपुर यांना “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच, सदरहू निधी कोषागारातून आहरित करण्यासाठी सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, चंद्रपुर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. आहरण व संवितरण अधिकारी यांनी आवश्यक तरतूद संबंधित यंत्रणेस वितरीत करावी. तसेच, कामाबाबतचा अहवाल वेळोवेळी शासनास सादर करावा.

६. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, चंद्रपुर व सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, चंद्रपुर यांनी सर्व अटी व शर्तींच्या पुर्ततेशिवाय निधी खर्च करु नये. तसेच, याकरीता कोणत्याही परिस्थितीत अतिरिक्त निधी मंजूर केला जाणार नाही.

७. याबाबतचा खर्च सन २०२४-२५ या वित्तीय वर्षात मागणी झेडजी-३, मुख्य लेखाशिर्ष २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागास वर्ग यांचे कल्याण, ०३ मागासवर्गाचे कल्याण, (०१) (०३) विमुक्त जाती भटक्या जमाती यांच्याकरीता यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना (२२२५-ई ८२१) ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली वित्तीय वर्ष २०२४-२५ करीता प्राप्त आर्थिक तरतूदीतून भागविण्यात यावा.

८. याद्वारे वितरीत करण्यात येणाऱ्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापाल व शासनास सादर करण्याची जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

९.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२४०७१११६५७२८३०३४ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DINESH ROHIDAS CHAVAN

Digitally signed by DINESH ROHIDAS CHAVAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=OTHER BACKWARD BAHUJAN WELFARE DEPARTMENT,
2.5.4.20=c0edee7a8805e86e41846cf28cf151b9ce48bb88ebf4f2e8a7fc10e8dcad98ec, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=8C2377ED235498603821D49922A210871FF6FB9B369722AC707AEE7DCD87F2BD, cn=DINESH ROHIDAS CHAVAN
Date: 2024.07.11 17:08:58 +05'30'

(दिनेश चव्हाण)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. मा. उप मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. मा. मंत्री (इतर मागास बहुजन कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. प्रधान सचिव, (इतर मागास बहुजन कल्याण विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १ /२, मुंबई/नागपूर.
१२. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.
१३. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, चंद्रपुर.
१४. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे.
१५. प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग (प्रादेशिक), नागपुर.
१६. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, चंद्रपुर.
१७. सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, चंद्रपुर.
१८. जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,चंद्रपुर.
१९. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
२०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / नागपूर.
२१. जिल्हा कोषागार अधिकारी,चंद्रपुर.
२२. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३. निवड नस्ती (योजना-१).